महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे

सर्व्हे नं. ८३२ ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे,
बालचित्रवाणी शेजारी , भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे – ४११००४

Telephone No. – 020-25705122/25705000
Email ID – msbospune@gmail.com

FAX NO. – 020- 25665807
Website – http://msbos.mh-ssc.ac.in

प्राथमिक (इयत्ता ५ वी) व उच्च प्राथमिक (इयत्ता ८ वी)

उमेदवार नाव नोंदणी प्रवेश, केंद्र संचालन इत्यादी बाबत

# माहिती पुस्तिका

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे

या पुस्तिकेच्या कोणत्याही भागाचे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, पुणे यांच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून मुद्रण किंवा पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.

**प्रकाशक**

डॉ. अशोक भोसले
सचिव,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ
सर्व्हे नं. ८३२ ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे,
बालचित्रवाणीशेजारी , भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे – ४११००४

दूरध्वनी – ०२०-२५७०५१२२/२५७०५०००

फॅक्स . – 020- 25665807
Email ID – msbospune@gmail.com
Website – http://msbos.mh-ssc.ac.in

**संपादन**
राजेंद्र आंधळे
राज्य समन्वयक,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, बालचित्रवाणीशेजारी ,
सर्व्हे नं. ८३२ ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर पुणे – ४११००४

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ आणि त्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेल्या कृती आराखडयामध्ये मुक्त शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे. अनेक शिक्षण तज्ज्ञ, संस्था यांनी व्यवसायाभिमुख शिक्षण आणि मुक्त शिक्षण याची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केलेली आहे. मुक्त शिक्षणाची गरज जगातील अनेक देशांनी ओळखली असून त्यांनी मुक्त शिक्षणाची कल्पना स्विकारलेली आहे.

शिक्षणामुळे मनुष्याच्या विचारांचा पाया भक्कम होतो. शिक्षण ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी निरंतर प्रक्रिया आहे. माणसाचा सामाजिक व आर्थिक स्तर सुधारण्यात शिक्षणाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. समाजातील प्रत्येक घटकातील मूल शिकले पाहिजे याकरिता अनेक योजना असूनही काही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. तसेच काही दिव्यांग विद्यार्थीही मुख्य प्रवाहातील औपचारिक शिक्षण घेण्यास असमर्थ आहेत. सद्यःस्थितीत इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या शैक्षणिक प्रवासात विद्यार्थ्यांची विविध टप्प्यांवर गळती होत आहे. त्यामध्ये मुलींच्या गळतीचे प्रमाणही अधिक आहे. कलाकार, खेळाडू, विशेष गती असणारे विद्यार्थी यांचेसाठी पर्यायी शिक्षणाची उपलब्धता या बाबी विचारात घेवून केंद्रीय स्तरावरील राष्ट्रीय मुक्त विद्यालय योजनेच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाबरोबरच गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड नसणारी प्राथमिक स्तरावरील (इयत्ता ५ वी), उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता ८ वी), माध्यमिक स्तरावरील (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक स्तरावरील (इयत्ता १२ वी) समकक्ष परीक्षा अशी मुक्त शिक्षणाची सुविधा महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यापैकी इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी नावनोंदणी करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी सदर माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

मुक्त विद्यालय मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांमुळे आर्थिक, सामाजिक व अन्य कारणामुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांच्या जीवनात एक नवीन आशा निर्माण होईल. औपचारिक शिक्षण न घेतलेल्या (पूर्वी शाळेत न गेलेल्या) किंवा औपचारिक शिक्षण अर्धवट झालेल्यांना मुक्त विद्यालय मंडळाच्या जवळच्या संपर्क केंद्रात नांव नोंदणी करून प्रवेश घेता येईल. या सुविधेअंतर्गत सोयीनुसार अध्ययनाची संधी, आवश्यकतेनुसार विषय निवडीचे स्वातंत्र्य, निवड केलेल्या विषयाची/विषयांची परीक्षा एकाच वेळी किंवा टप्प्या टप्प्याने देण्याची सुविधा, व शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या सर्वांना समकक्ष शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संपर्क केंद्रात उमेदवारांना नावनोंदणी अर्ज, परीक्षा प्रवेश अर्ज व परीक्षेसाठी विषयांची निवड करणे, मूल्यमापन इ.बाबत मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच उमेदवारांना स्वयंअध्ययनासाठी आवश्यक असलेले स्वयंअध्ययन साहित्य पुरविण्यात येईल. तसेच उमेदवारांना त्यांच्या गरजेनुसार विषयांचे मार्गदर्शन करून स्वयंअध्ययनाची सुविधा संपर्क केंद्रावर उपलब्ध करून देण्यात येईल.

उमेदवार नावनोंदणी पध्दती, इयत्तानिहाय विषय योजना, मूल्यमापन पध्दती, संपर्क केंद्राची कार्यपध्दती, स्वयंअध्ययन साहित्य इ. बाबतचा तपशील माहिती पुस्तिकेत देण्यात आला आहे.

उमेदवारांसह पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांनासुध्दा सदर पुस्तिका मार्गदर्शक ठरेल. असा विश्वास वाटतो.

शरद गोसावी
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ,पुणे

स्थळः- पुणे
दिनांकः-



Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ,पुणे

## माहिती पुस्तिका

## (प्राथमिक स्तर इयत्ता ५ वी व उच्च प्राथमिक स्तर इयत्ता ८ वी)

* अनुक्रमणिका *


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | समकक्षता | |
| २ | मुक्त शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये | |
| ३ | मुक्त शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम व पाठयपुस्तके | |
| ४ | उमेदवारांची नावनोंदणी कार्यपध्दती | |
| ५ | नावनोंदणी कालावधी | |
| ६ | उमेदवाराची प्रवेश पात्रता. (प्राथमिक स्तर इ. ५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी) | |
| ७ | प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे. (प्राथमिक स्तर इ. ५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८वी) | |
| ८ | ऑनलाईन प्रवेशाची कार्यपध्दती. | |
| ९ | नोंदणी शुल्क (फी) व परीक्षा शुल्क (फी).<br>(प्राथमिक स्तर इ. ५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी) | |
| १० | विषयांची निवड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.<br>(प्राथमिक स्तर इ. ५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी) | |
| ११ | विषय योजना. (प्राथमिक स्तर इ. ५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी) | |
| १२ | परीक्षा पध्दती व मूल्यमापन (प्राथमिक स्तर इ. ५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी) | |
| १३ | संपर्क केंद्र | |
| १४ | परीक्षा आवेदनपत्रे, प्रवेशपत्र, गुणपत्रक व प्रमाणपत्र. | |
| १५ | शुल्क (फी) परतावा. | |
| | विभागीय कार्यालयाची कामे - | |
| | परिशिष्टे –<br>१. प्रपत्र -अ - प्राथमिक स्तर इ.५ वी /उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी परीक्षेसाठी नावनोंदणी करतेवेळी नांव कोणत्याही शाळेच्या पटावर नसल्याबाबत उमेदवाराने सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना<br>२. प्रपत्र -ब - औपचारिक शाळेत गेला नसल्याबाबत उमेदवाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.<br>३. प्रपत्र -क - औपचारिक शाळेत गेला नसल्याबाबत उमेदवाराच्या पालकाने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.<br>४. प्रपत्र -ड - वयाचा दाखला उपलब्ध नसल्यास उमेदवाराच्या वयाबाबत पालकाने द्यावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना.<br>५. प्रपत्र -इ - शाळा सोडल्याच्या दाखल्याऐवजी मुक्त विद्यालय मंडळाच्या उमेदवारास द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना.<br>६. प्रपत्र-फ - विभागीय मंडळाचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक, ई-मेलआयडी. इ. | |




Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे

औपचारिक शिक्षण न घेतलेल्या (पूर्वी शाळेत न गेलेल्या) किंवा औपचारिक शिक्षण अर्धवट सोडलेल्या घटकांना या योजने अंतर्गत प्राथमिक स्तर इयत्ता ५ वी, उच्च प्राथमिक स्तर इयत्ता ८ वी समकक्ष परीक्षेसाठी संपर्क केंद्रामार्फत नांव नोंदणी करता येईल.

१) **समकक्षता :-** महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या प्राथमिक स्तर इयत्ता ५ वी व उच्च प्राथमिक स्तर इयत्ता ८ वी या परीक्षांना शासनाच्या नियमित परीक्षांची समकक्षता राहील.

२) **मुक्त शिक्षण योजनेची वैशिष्टये :-**

१. सर्वासाठी शिक्षणाची व्यवस्था.
२. सोयीनुसार शिक्षणाची संधी.
३. विषयांची लवचिकता.
४. संचित मूल्यांची व्यवस्था (Transfer Of Credits).
५. जादा व्यावसायिक विषयांची उपलब्धता.
६. अतिप्रगत विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणा पलिकडे अनेक विषयांचे पर्याय उपलब्ध.
७. दिव्यांगासाठी विशेष विषय योजना.
८. तज्ज्ञ विषय शिक्षकांचे मार्गदर्शन.

३) **मुक्त शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम व पाठयपुस्तके :-**

१. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्याप्राधिकरण), पुणे व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे व PSSIVE, भोपाळ यांनी तयार केलेला प्रचलित अभ्यासक्रम व पाठयपुस्तके या योजनेसाठी लागू राहतील. या पाठयपुस्तकांवर आधारीत महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाने तयार केलेले स्वयंअध्ययन साहित्य/पुस्तिका लागू रहातील.
२. कला विषयांतर्गत (१) सृजनात्मक कला निर्मिती (चित्रकला, हस्तकला, रंगकाम), (२) भारतीय संगीत (गायन,वादन,नृत्य),(३) गृहोपयोगी व शालोपयोगी साहित्यनिर्मिती (दिव्यांगासाठी) या विषयांसाठी मुक्त विद्यालय मंडळामार्फत पाठयपुस्तके व स्वयंअध्ययन साहित्य तयार करण्यात आले आहे.

४) **उमेदवार नावनोंदणी कार्यपध्दती -**

१. प्रवेशाची नोंदणी फक्त Online पध्दतीनेच करणे आवश्यक असेल.
२. नावनोंदणीसाठी संपर्क केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली असून Online अर्ज भरण्यास संपर्क केंद्र मदत/मार्गदर्शन करतील. (संपर्क केंद्रांच्या नावांची यादी Online **http://msbos.mh-ssc.ac.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे)
३. प्रत्येक इयत्तेसाठी (इयत्ता ५ वी, ८ वी ) स्वतंत्रपणे नावनोंदणी करणे आवश्यक.
४. नावनोंदणी केल्यानंतर येणाऱ्या सहा महिन्यानंतरच्या जून/डिसेंबर परीक्षेसाठी उमेदवार पात्र होईल.
५. नावनोंदणी केलेल्या पात्र उमेदवारास नावनोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल व एकदा प्राप्त झालेले नावनोंदणी प्रमाणपत्र पाच वर्षासाठी किंवा जास्तीत जास्त सलग नऊ परीक्षांसाठी वैध राहील.
६. पुनर्नोंदणीची सुविधा उपलब्ध राहील. मात्र त्याचा कालावधी वरील क्र. ५ नुसार राहील.



Scanned with CamScanner

५) नांवनोंदणी कालावधी :-

* माहे जूनमध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी
परीक्षेपूर्वी ६ महिने म्हणजे -
१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर अखेर
(नियमित शुल्क कालावधी-१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर
विलंब शुल्क कालावधी १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर)

* माहे डिसेंबरमध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी
परीक्षेपूर्वी ६ महिने म्हणजे -
१ एप्रिल ते ३१ मे अखेर
(नियमित शुल्क कालावधी-१ एप्रिल ते १५ मे
विलंब शुल्क कालावधी १६ मे ते ३१ मे)

६) उमेदवाराची प्रवेश पात्रता:-

| अ. क्र. | प्राथमिक स्तर इयत्ता ५ वी समकक्ष | अ. क्र. | उच्च प्राथमिक स्तर इयत्ता ८ वी समकक्ष |
|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे वय नोंदणीच्या दिनांकास १० वर्षे पूर्ण असावे. कमाल वयाची अट नाही. | १ | उमेदवाराचे वय नोंदणीच्या दिनांकास १३ वर्षे पूर्ण असावे. कमाल वयाची अट नाही. |
| २ | वयाचा दाखला सादर करावा लागेल. | २ | वयाचा दाखला सादर करावा लागेल. |
| ३ | पूर्वी औपचारिक शाळेत गेला असल्यास, पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला/ प्रमाणपत्र आवश्यक. | ३ | पूर्वी औपचारिक शाळेत गेला असल्यास, पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला/ प्रमाणपत्र आवश्यक. |
| ४ | वय वर्षे १८ पेक्षा जास्त असलेला उमेदवार औपचारिक शाळेत गेला नसल्यास, विहित नमुन्यातील स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक. | ४ | वय वर्षे १८ पेक्षा जास्त असलेला उमेदवार औपचारिक शाळेत गेला नसल्यास, विहित नमुन्यातील स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक. |
| ५ | वय वर्षे १८ पेक्षा कमी असलेला उमेदवार औपचारिक शाळेत गेला नसल्यास, त्याच्या पालकाने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक. | ५ | वय वर्षे १८ पेक्षा कमी असलेला उमेदवार औपचारिक शाळेत गेला नसल्यास, त्याच्या पालकाने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक. |

७) प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:

१. वयाचा दाखला सादर करावा लागेल. (इ.५ वी/इ. ८ वी साठी) (कोणताही एक)
  * नगरपालिका/महानगरपालिका यांच्या जन्म मृत्यू नोंदवहीवरून देण्यात आलेला दाखला.
  * जन्म मृत्यू नोंदवहीवरून देण्यात आलेला दाखला.
  * शाळा सोडल्याचा दाखला.

२. पूर्वी औपचारिक शाळेत गेला असल्यास, त्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला.

३. पूर्वी औपचारिक शाळेत गेला नसल्यास (इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी)
१८ वर्षापेक्षा अधिक वय असल्यास विहित नमुन्यातील स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र.(प्रपत्र-ब)
१८ वर्षापेक्षा कमी वय असल्यास पालकांचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र.(प्रपत्र-क)

४. दोन वर्षे महाराष्ट्रात अधिवास असलेबाबतचा पुरावा म्हणून खालीलपैकी कोणताही एक पुरावा आवश्यक - (आधारकार्ड, डोमीसाईल सर्टिफिकेट, बँकेचे पासबुक, टेलिफोन बील, वीज बील, नोकरीच्या ठिकाणचे ओळखपत्र इ.)

५. नोंदणी करतेवेळी उमेदवाराचे कोणत्याही शाळेच्या पटावर नांव नसल्याचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक. (परिशिष्ट-अ)



Scanned with CamScanner

८) **Online प्रवेशाची कार्यपध्दती –**

**सर्व प्रकारच्या Online प्रवेशासाठी कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील.**

१) **http://msbos.mh-ssc.ac.in** या वेबसाईटवर log.in करणे.

२) अर्ज भरण्यासाठी पुढील लिंक वर क्लिक करा.

**http://msbos.mh-ssc.ac.in/Application_Form.aspx**

३) अर्ज भरण्याची भाषा निवडा (मराठी किंवा इंग्रजी)

४) अर्ज भरताना आपली वैयक्तिक माहिती अचूक भरावी. (उदा. स्वतःचे नांव, पत्ता, जन्मतारीख, आधार क्रमांक, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी., इयत्ता, विषय, माध्यम व संपर्क केंद्र क्रमांक इ.) त्या अर्जावर अलीकडचा स्वतःचा फोटो scan करून Upload करावा व तो Submit करावा.

५) मराठीतून माहिती भरण्यासाठी युनिकोड उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे ती माहिती बरोबर असल्याची खात्री करावी तसेच आवश्यकतेनुसार दुरूस्ती करून माहिती अंतिम करावी.

६) उमेदवाराने कागदपत्रे scan करण्यासाठी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते Upload करावे. उमेदवाराने अर्जामध्ये मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी नोंदविणे अनिवार्य (Compulsory) आहे.

७) उमेदवार नावनोंदणी शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क पुढील तीन प्रकारे भरू शकेल. १) ऑनलाईन भरणा (Online Payment), २) NEFT व्दारे. ३) संपर्क केंद्रावर रोखीने शुल्क भरल्यास त्याची पावती उमेदवाराने संपर्क केंद्रावरून उपलब्ध करून घ्यावी.

८) उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या नोंदणी अर्जाची प्रत (Printout), नोंदणी शुल्क व इतर आवश्यक कागदपत्रे (मूळ प्रमाणपत्रांसह) संपर्क केंद्रावर दोन प्रतीत त्वरित/निर्धारित मुदतीत जमा करावीत व एक प्रत स्वतःकडे ठेवावी.

९) पात्र उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) उपलब्ध करून देण्यात येईल.

१०) **नोंदणी शुल्क (फी) व परीक्षा शुल्क(फी) :**

| **प्राथमिक स्तर – इयत्ता ५ वी** | **शुल्क रक्कम रुपये** | **उच्च प्राथमिक स्तर – इयत्ता ८ वी** | **शुल्क रक्कम रुपये** |
|---|---|---|---|
| १) नोंदणी शुल्क | १,०००/- | १) नोंदणी शुल्क | १,०००/- |
| २) पुनर्नोंदणी शुल्क | ५००/- | २) पुनर्नोंदणी शुल्क | ५००/- |
| ३) परीक्षा शुल्क प्रती विषय | १००/- | ३) परीक्षा शुल्क प्रती विषय | १००/- |
| ४) विलंब शुल्क | २००/- | ४) प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क प्रती विषय | २५/- |
| | | ५) विलंब शुल्क | २००/- |

११) **विषयांची निवड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना –**

१. उमेदवारास सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या विषय योजनेनुसार ५ विषय घेणे अनिवार्य राहील. (टीपः-गट-अ = दोन, गट-ब = दोन व गट-क =एक असे एकूण पाच विषय घेणे अनिवार्य)

२. प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर निर्धारित भाषांपैकी कोणत्याही दोन भाषा किंवा कोणतेही दोन भाषा विषय घेणे अनिवार्य राहील.

३. परीक्षेचे माध्यम मराठी, इंग्रजी व उर्दू यापैकी निवडावे लागेल.

४. सर्व विषयांची परीक्षा एकाच वेळी देण्याचे बंधन असणार नाही. पाच वर्षात एकूण नऊ परीक्षांना हव्या त्या विषयाला/विषयांना परीक्षार्थी प्रविष्ट होऊ शकेल.

५. दरवर्षी जून व डिसेंबर असे वर्षातून दोन वेळा परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

६. इयत्ता ५ वी/८ वी चा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळेल.



Scanned with CamScanner

११) विषय योजना -

## प्राथमिक स्तर - इयत्ता ५ वी

### इयत्ता ५ वी (सर्वसाधारण)

| अ. क्र. | विषय कोड | विषयाचे नांव | निवडावयाचे विषय |
|---|---|---|---|
| **गट-अ** | | | |
| १ | AA -01 | मराठी | कोणत्याही दोन भाषा विषय |
| २ | AA - 02 | हिंदी | |
| ३ | AA-03 | इंग्रजी | |
| ४ | AA - 04 | संस्कृत | |
| ५ | AA-05 | उर्दू | |
| ६ | AA-06 | गुजराती | |
| ७ | AA-07 | कन्नड | |
| **गट - ब** | | | |
| १ | AB-01 | गणित | दोन्ही विषय अनिवार्य |
| २ | AB-02 | परिसर अभ्यास | |
| | | | |
| **गट - क** | | | |
| १ | AC- 01 | **कला विषय**<br>**१) सृजनात्मक कला निर्मिती-**<br>१. चित्रकला<br>२. हस्तकला<br>३. रंगकाम | कोणताही एक विषय |
| २ | AC- 02 | **२) भारतीय संगीत**<br>१. गायन<br>२. वादन<br>३. नृत्य | |
| ३ | | | |

### इयत्ता ५ वी (दिव्यांगांकरिता)

| अ. क्र. | विषय कोड | विषयाचे नांव | निवडावयाचे विषय |
|---|---|---|---|
| **गट-अ** | | | |
| १ | AA -01 | मराठी | कोणत्याही एक किंवा दोन भाषा विषय. |
| २ | AA -02 | हिंदी | |
| ३ | AA-03 | इंग्रजी | |
| ४ | AA - 04 | संस्कृत | |
| ५ | AA-05 | उर्दू | |
| ६ | AA-06 | गुजराती | |
| ७ | AA-07 | कन्नड | |
| **गट - ब** | | | |
| १ | AB-01 | गणित | |
| २ | AB-02 | परिसर अभ्यास | |
| | | | |
| **गट - क** | | | |
| १ | AC- 01 | **कला विषय**<br>**१) सृजनात्मक कला निर्मिती-**<br>१. चित्रकला<br>२. हस्तकला<br>३. रंगकाम | गट-ब व क कोणतेही तीन किंवा चार विषय<br>(टिप:-गट अ, ब,क मिळून पाच विषय घेणे अनिवार्य) |
| २ | AC- 02 | **२) भारतीय संगीत**<br>१. गायन<br>२. वादन<br>३. नृत्य | |
| ३ | AC- 03 | **३) गृहोपयोगी व शालोपयोगी साहित्य निर्मिती** (दिव्यांगांसाठी) | |

एकूण 05 विषय



Scanned with CamScanner

# Primary Stage - Std. 5th

**Std. 5th (General Student)**

| Sr. No. | Subject Code | Subject Name | Subjects to be chosen |
|---|---|---|---|
| | | **Group - A** | |
| 1 | AA-01 | Marathi | Any Two Languages |
| 2 | AA-02 | Hindi | |
| 3 | AA-03 | English | |
| 4 | AA-04 | Sanskrit | |
| 5 | AA-05 | Urdu | |
| 6 | AA-06 | Gujarati | |
| 7 | AA-07 | Kannada | |
| | | **Group - B** | |
| 1 | AB-01 | Mathematics | Both Subject Compulsury |
| 2 | AB-02 | Environmental Studies | |
| | | **Group - C** | |
| 1 | AC- 01 | **Art Subject 1) Production of Creative Art-** 1.Drawing 2. Handicraft 3. Painting | Any One Subject |
| 2 | AC- 02 | **2) Indian Music** 1.Singing 2. Playing Instrument 3. Dance | |

**Std. 5th (For Divyang Student)**

| Sr. No. | Subject Code | Subject Name | Subjects to be chosen |
|---|---|---|---|
| | | **Group - A** | |
| 1 | AA-01 | Marathi | Any One or Two Languages |
| 2 | AA-02 | Hindi | |
| 3 | AA-03 | English | |
| 4 | AA-04 | Sanskrit | |
| 5 | AA-05 | Urdu | |
| 6 | AA-06 | Gujarati | |
| 7 | AA-07 | Kannada | |
| | | **Group - B** | |
| 1 | AB-01 | Mathematics | Group - B &C Any Three Or Four Subjects (Note:- Including Group A,B,C Five Subjects Compulsury ) |
| 2 | AB-02 | Environmental Studies | |
| | | **Group - C** | |
| 1 | AC- 01 | **Art Subject 1) Production of Creative Art-** 1.Drawing 2. Handicraft 3. Painting | |
| 2 | AC- 02 | **2) Indian Music** 1.Singing 2. Playing Instrument 3. Dance | |
| 3 | AC- 03 | **3) Production of Home appliances & School Materials.** (For Divyang Student) | |



Scanned with CamScanner

# उच्च प्राथमिक स्तर -इयत्ता ८ वी

## इयत्ता ८ वी (सर्वसाधारण)

| उपलब्ध विषय योजना | | | निवडावयाचे विषय |
|---|---|---|---|
| **गट-अ** | | | |
| अ. क्र. | विषय कोड | विषयाचे नांव | |
| 1 | BA-01 | मराठी | कोणत्याही दोन भाषा विषय |
| 2 | BA-02 | हिंदी | |
| 3 | BA-03 | इंग्रजी | |
| 4 | BA-04 | संस्कृत | |
| 5 | BA-05 | उर्दू | |
| 6 | BA-06 | गुजराती | |
| 7 | BA-07 | कन्नड | |
| **गट-ब** | | | |
| 1 | BB-01 | गणित | गणित विषय अनिवार्य |
| **गट-क** | | | |
| 1 | BC-01 | विज्ञान | गट-क व ड कोणतेही दोन विषय |
| 2 | BC-02 | इतिहास व ना.शास्त्र | |
| 3 | BC-03 | भूगोल | |

## इयत्ता ८ वी (दिव्यांगांकरिता)

| उपलब्ध विषय योजना | | | निवडावयाचे विषय |
|---|---|---|---|
| **गट-अ** | | | |
| अ. क्र. | विषय कोड | विषयाचे नांव | |
| 1 | BA-01 | मराठी | कोणत्याही एक किंवा दोन भाषा विषय. |
| 2 | BA-02 | हिंदी | |
| 3 | BA-03 | इंग्रजी | |
| 4 | BA-04 | संस्कृत | |
| 5 | BA-05 | उर्दू | |
| 6 | BA-06 | गुजराती | |
| 7 | BA-07 | कन्नड | |
| **गट-ब** | | | गट-ब व क कोणतेही तीन किंवा चार विषय |
| 1 | BB-01 | गणित | |
| 2 | BB-02 | विज्ञान | |
| 3 | BB-03 | इतिहास व ना.शास्त्र | |
| 4 | BB-04 | भूगोल | |
| **गट-क** | | | |
| **NSQF Subjects** | | | |
| 1 | BD-01 | मल्टीस्कील फाउंडेशन कोर्स | |
| 2 | BD-02 | ऑटोमोबाईल सर्व्हीस टेक्नीशियन | |
| 3 | BD-03 | रिटेल मर्कडायझिंग | |
| 4 | BD-04 | हेल्थ केअर-जनरल डयुटी असिस्टंन्स | |
| 5 | BD-05 | ब्युटी अॅन्ड वेलनेस | |
| 6 | BD-06 | फिजीकल एज्युकेशन अॅन्ड स्पोर्टस् | |
| 7 | BD-07 | टुरिझम अॅन्ड ट्रॅव्हल | |
| 8 | BD-08 | अॅग्रिकल्चर | |
| 9 | BD-09 | मिडीया अॅन्ड एन्टरटेन्मेंट | |
| 10 | BD-10 | बँकींग अॅन्ड फायनाशियल सर्व्हीसेस | |
| 11 | BD-11 | मॅकेनिकल टेक्नॉलॉजी | |
| 12 | BD-12 | इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी | |
| 13 | BD-13 | इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी | |
| 14 | BD-14 | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड हार्डवेअर इन्स्टॉलेशन टेक्निशियन | |
| 15 | BE-01 | कला विषय - १) सृजनात्मक कलानिर्मिती- (१) चित्रकला (२) हस्तकला (३) रंगकाम | |
| 16 | BE-02 | २) भारतीय संगीत- (१) गायन(२) वादन(३)नृत्य | |
| 17 | BE-03 | ३ ) गृहोपयोगी व शालोपयोगी साहित्यनिर्मिती - दिव्यांगांसाठी | |



Scanned with CamScanner

## उच्च प्राथमिक स्तर -इयत्ता ८ वी

| इयत्ता ८ वी (सर्वसाधारण) | | | | इयत्ता ८ वी (दिव्यांगांकरिता) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उपलब्ध विषय योजना | | | निवडावयाचे विषय | उपलब्ध विषय योजना | | | निवडावयाचे विषय |
| गट–ड | | | | | | | |
| NSQF विषय | | | | | | | |
| 1 | BD-01 | मल्टीस्कील फाउंडेशन कोर्स | गट– क व ड कोणतेही दोन विषय | | | | |
| 2 | BD-02 | ऑटोमोबाईल सर्व्हीस टेक्नीशियन | | | | | |
| 3 | BD-03 | रिटेल मर्कंडायझिंग | | | | | |
| 4 | BD-04 | हेल्थ केअर-जनरल ड्युटी असिस्टंन्स | | | | | |
| 5 | BD-05 | ब्युटी अॅन्ड वेलनेस | | | | | |
| 6 | BD-06 | फिजीकल एज्युकेशन अॅन्ड स्पोर्टस् | | | | | |
| 7 | BD-07 | टुरिझम अॅन्ड ट्रॅव्हल | | | | | |
| 8 | BD-08 | अॅग्रिकल्चर | | | | | |
| 9 | BD-09 | मिडीया अॅन्ड एन्टरटेन्मेंट | | | | | |
| 10 | BD-10 | बँकींग अॅन्ड फायनान्शियल सर्व्हीसेस | | | | | |
| 11 | BD-11 | मेकॅनिकल टेक्नॉलॉजी | | | | | |
| 12 | BD-12 | इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी | | | | | |
| 13 | BD-13 | इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी | | | | | |
| 14 | BD-14 | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड हार्डवेअर इन्स्टॉलेशन टेक्निशियन | | | | | |
| 15 | BE-01 | कला विषय – १) सृजनात्मक कलानिर्मिती– (१) चित्रकला (२) हस्तकला (३) रंगकाम | | | | | |
| 16 | BE-02 | २) भारतीय संगीत– (१) गायन (२) वादन (३) नृत्य | | | | | |

एकूण 07 विषय



Scanned with CamScanner

# Higher Primary Stage - Std. 8th

**Std. 8th (General Student)**

| Sr. No. | Subject Code | Subject Name | Subjects to be Chosen |
|---|---|---|---|
| **Group - A** | | | |
| 1 | BA-01 | Marathi | Any Two Languages |
| 2 | BA-02 | Hindi | |
| 3 | BA-03 | English | |
| 4 | BA-04 | Sanskrit | |
| 5 | BA-05 | Urdu | |
| 6 | BA-06 | Gujarati | |
| 7 | BA-07 | Kannada | |
| **Group - B** | | | |
| 1 | BB-01 | Mathematics | Compulsury Subject |
| **Group - C** | | | |
| 1 | BC-01 | Science | Group - C & D Any Two Subjects |
| 2 | BC-02 | History & Civics | |
| 3 | BC-03 | Geography | |

**Std. 8th (For Divyang Student)**

| Sr. No. | Subject Code | Subject Name | Subjects to be Chosen |
|---|---|---|---|
| **Group - A** | | | |
| 1 | BA-01 | Marathi | Any One or Two Languages |
| 2 | BA-02 | Hindi | |
| 3 | BA-03 | English | |
| 4 | BA-04 | Sanskrit | |
| 5 | BA-05 | Urdu | |
| 6 | BA-06 | Gujarati | |
| 7 | BA-07 | Kannada | |
| **Group - B** | | | Group - B &C Any Three Or Four Subjects |
| 1 | BB-01 | Mathematics | |
| 2 | BB-02 | Science | |
| 3 | BB-03 | History & Civics | |
| 4 | BB-04 | Geography | |
| **Group - C** | | | |
| **NSQF Subjects** | | | |
| 1 | BD-01 | Multi-skill Foundation Course | |
| 2 | BD-02 | Automobile Service Technician | |
| 3 | BD-03 | Retail Merchandizing | |
| 4 | BD-04 | Healthcare-General Duty Assistant | |
| 5 | BD-05 | Beauty & Wellness | |
| 6 | BD-06 | Physical Education & Sports | |
| 7 | BD-07 | Tourism & Travels | |
| 8 | BD-08 | Agriculture | |
| 9 | BD-09 | Media & Entertainment | |
| 10 | BD-10 | Bankinag & Financial Services | |
| 11 | BD-11 | Mechanical Technology | |
| 12 | BD-12 | Electrical Technology | |
| 13 | BD-13 | Electronics Technology | |
| 14 | BD-14 | Electronics & Hardware Installation Technician | |
| 15 | BE-01 | **Art -** **1) Production of Creative Art-** 1.Drawing 2. Handicraft 3. Painting | |
| 16 | BE-02 | **2) Indian Music** 1.Singing, 2. Playing Instrument, 3. Dance | |
| 17 | BE-03 | **3) Production of Home appliances & School Materials.** (For Divyang Student) | |



Scanned with CamScanner

# Higher Primary Stage - Std. 8th

| Std. 8th (General Student) | | | | Std. 8th (For Divyang Student) | |
|---|---|---|---|---|---|
| Available Subject Combination | | | Subjects to be Chosen | Available Subject Combination | Subjects to be Chosen |
| Group - D | | | | | |
| NSQF Subjects | | | | | |
| 1 | BD-01 | Multi-skill Foundation Course | Group - C & D Any Two Subjects | | |
| 2 | BD-02 | Automobile Service Technician | | | |
| 3 | BD-03 | Retail Merchandizing | | | |
| 4 | BD-04 | Healthcare-General Duty Assistant | | | |
| 5 | BD-05 | Beauty & Wellness | | | |
| 6 | BD-06 | Physical Education & Sports | | | |
| 7 | BD-07 | Tourism & Travels | | | |
| 8 | BD-08 | Agriculture | | | |
| 9 | BD-09 | Media & Entertainment | | | |
| 10 | BD-10 | Bankinag & Financial Services | | | |
| 11 | BD-11 | Mechanical Technology | | | |
| 12 | BD-12 | Electrical Technology | | | |
| 13 | BD-13 | Electronics Technology | | | |
| 14 | BD-14 | Electronics & Hardware Installation Technician | | | |
| 15 | BE-01 | **Art - 1) Production of Creative Art-** 1.Drawing 2. Handicraft 3. Painting | | | |
| 16 | BE-02 | **2) Indian Music-** 1.Singing 2. Playing Instrument 3. Dance | | | |



Scanned with CamScanner

१२) परीक्षा पध्दती व मूल्यमापन –

परीक्षा पध्दती व मूल्यमापन हे बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (R.T.E.) नुसार व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (C.C.E.) नुसार असेल.

१३) संपर्क केंद्र –

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारास वेळोवेळी मार्गदर्शन उपलब्ध होणेसाठी व त्याला विविध स्तरावर येणाऱ्या अडीअडचणीचे निराकरण करण्यासाठी संपर्क केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याची यादी ऑनलाईन उपलब्ध आहे.

उमेदवाराने परिसरातील त्याला सोयीचे असलेले संपर्क केंद्र, संपर्क केंद्राच्या यादीतून निवडावे. परिसरातील सोयीचे संपर्क केंद्र निवडण्याचा अधिकार उमदेवाराचा असेल. मात्र निवडलेले संपर्क केंद्र त्याला ती परीक्षा (इयत्ता ५ वी/इयत्ता ८ वी) पूर्ण होईपर्यंत बदलता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत संपर्क केंद्र बदलण्याचा/बदलून देण्याचा अधिकार मुक्त विद्यालय मंडळास राहील.

संपर्क केंद्रावर एक केंद्र समन्वयक व एक सहायक केंद्र समन्वयक असतील. केंद्र समन्वयक हे या संबंधित शाळेचे प्राचार्य/मुख्याध्यापक असतील. त्यांना या केंद्राचे केंद्र समन्वयक म्हणून काम पहाणे अनिवार्य राहील. केंद्र समन्वयक यांनी त्यांच्या अधिनस्त आस्थापनेवरील शिक्षकांपैकी एका शिक्षकाकडे सहायक केंद्र समन्वयक म्हणून जबाबदारी द्यावी.

या संपर्क केंद्राचे संचालन खालीलप्रमाणे राहील –

१. संपर्क केंद्रावर प्रवेश घेणारे उमेदवार हे परीक्षेपूर्वी तीन महिने शनिवार व रविवार वेळापत्रकानुसार संपर्क केंद्रावर उपस्थित राहतील. सदरचे वेळापत्रक मुक्त विद्यालय मंडळाकडून निश्चित करून दिले जाईल.
२. संपर्क केंद्रावर विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, परीक्षा फॉर्म (Online) भरून घेणे, प्रवेशपत्र देणे, गुणपत्रक व प्रमाणपत्र देणे ही कामे संपर्क केंद्रावर होतील.
३. संपर्क केंद्रावर स्वाध्याय पुस्तिका/कृतिपुस्तिका, प्रकल्प व अंतर्गत मूल्यमापन या बाबी मुक्त विद्यालय मंडळाच्या नियमाप्रमाणे पूर्ण करून घेण्याची जबाबदारी केंद्र समन्वयकाची राहील.
४. उमेदवारांना शक्यतो त्याच संपर्क केंद्र शाळेतील शिक्षक मार्गदर्शन करतील. आवश्यक वाटल्यास परिसरातील तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन घेता येईल.
५. संपर्क केंद्रांना विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले स्वयंअध्ययन साहित्य व इतर साहित्य देण्याची व्यवस्था मुक्त विद्यालय मंडळामार्फत करण्यात येईल. सदर साहित्य संपर्क केंद्र संबंधित विद्यार्थ्यांना वाटप करतील.
६. वरील सर्व कामे केंद्रसमन्वयक यांनी आपल्या सहायक केंद्रसमन्वयक तसेच शिक्षकांच्या मदतीने पूर्ण करून घ्यावयाची आहेत.
७. संपर्क केंद्र शाळेच्या समन्वयकांनी त्यांचे संपर्क केंद्रावर नोंदणी झालेल्या उमेदवारांची नोंद नियमित उमेदवारांसाठी उपयोगात आणण्यात येत असलेल्या जनरल रजिस्टरप्रमाणे एका स्वतंत्र रजिस्टरमध्ये करावी. रजिस्टरमध्ये परिशिष्ट-इ मध्ये नमूद असलेल्या सर्व माहितीची नोंद असणे आवश्य असेल. रजिस्टरमध्ये माहिती नोंदविताना ती अचूक व खाडाखोड न करता नोंदवावी. हे रजिस्टर संपर्क केंद्र शाळेचे कायम अभिलेख असल्याने त्याचे जतन योग्य व काळजीपूर्वक करावे.



Scanned with CamScanner

१४) आवेदन पत्रे, प्रवेश पत्र गुणपत्रक व प्रमाणपत्र –

१. उमेदवाराने परीक्षेचे आवेदनपत्र निर्धारित मुदतीत भरणे आवश्यक असेल. त्या विषयीच्या सूचना संपर्क केंद्रामार्फत उमेदवारांना यथासमय देण्यात येतील.

२. संपर्क केंद्रावरून वेळापत्रक, प्रवेशपत्रे इ. कागदपत्रे घेवून जाण्याची जबाबदारी संपूर्णतः उमेदवाराची राहील. संबंधित उमेदवाराने याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

३. उमेदवारांना गुणपत्रक व प्रमाणपत्र संपर्क केंद्रामार्फत वितरित करण्यात येईल.

४. इयत्ता ५ वी/८ वी च्या अंतिम मूल्यमापनानंतर अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण न करू शकणाऱ्या उमेदवारास पुनर्परीक्षार्थी म्हणून पुढील प्रयत्नासाठी (परीक्षेसाठी) परीक्षेचे आवेदनपत्र मूळ संपर्क केंद्रामार्फतच सादर करावे लागेल.

५. नांवनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) मिळाल्यानंतर परीक्षेस प्रविष्ठ होऊन विहित अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारास तो त्या संपर्क केंद्रशाळेचा नियमित उमेदवार नसल्याने शाळा सोडल्याचा दाखला देता येत नाही. अशा उमेदवारांना पुढील शिक्षण घेण्यात अडचणी येऊ नयेत म्हणून मंडळाने विहित केलेल्या नमुन्यात **(परिशिष्ट-इ)** प्रमाणपत्र देण्यात येईल.

**१५) शुल्क परतावा –**

**अ– नावनोंदणी शुल्क –**

१. विभागीय मंडळास उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जांची छाननी केली जाईल. अपात्र असलेल्या उमेदवारांना त्यांच्या अपात्रतेबाबत कळविले जाईल व त्यांनी भरलेल्या नावनोंदणी शुल्कातून रु १००/- इतका प्रशासकीय खर्च वजा करून उर्वरित रक्कम उमेदवारास परत केली जाईल.

२. नावनोंदणी ते परीक्षा सुरू होण्यापूर्वी उमेदवाराचा मृत्यू झाल्यास त्याने भरलेले संपूर्ण नावनोंदणी शुल्क त्याच्या जवळच्या नातेवाईकास संपर्क केंद्र समन्वयकामार्फत अर्ज केल्यास आणि मुक्त विद्यालय मंडळाच्या अध्यक्षांच्या मते अर्जदार हा असा परतावा मिळण्याचा हक्क असणारी व्यक्ती असेल तर परत करण्यात येईल.

३. या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही परिस्थितीत उमेदवाराने भरलेले नावनोंदणी शुल्क परत करण्यात येणार नाही.

४. उमेदवाराने विलंब शुल्क भरले असल्यास ते कोणत्याही कारणास्तव परत करण्यात येणार नाही.

**ब– परीक्षा शुल्क –**

१. परीक्षा सुरू होण्यापूर्वी उमेदवाराचे निधन झाल्यास त्याने भरलेले संपूर्ण परीक्षा शुल्क त्याच्या जवळच्या नातेवाईकास संबंधित संपर्क केंद्र समन्वयकामार्फत अर्ज केल्यास आणि मुक्त विद्यालय मंडळाच्या अध्यक्षांच्या मते अर्जदार हा असा परतावा मिळण्याचा हक्क असणारी व्यक्ती असेल तर परत करण्यात येईल.



Scanned with CamScanner

२. उमेदवार परीक्षा कालावधीत आजारी पडला असेल आणि त्याला परीक्षेस प्रविष्ट होता येणार नसेल व त्याने परीक्षा सुरू झाल्याच्या सात दिवसाचे आत संपर्क केंद्र शाळेच्या समन्वयकामार्फत नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीच्या प्रमाणपत्रासह अर्ज केल्यास त्याला परीक्षा शुल्काचा निम्मा परतावा दिला जाईल.

३. जो उमेदवार परीक्षेचे आवेदनपत्र सादर केल्यानंतर राष्ट्रीय आणीबाणीच्या कालावधीमध्ये सैनिकी सेवेमध्ये दाखल झाला असेल व त्याने शुल्काच्या परताव्यासाठी समादेशक अधिकाऱ्याने स्वाक्षरी केलेल्या प्रमाणपत्रासह संपर्क केंद्रशाळा समन्वयकामार्फत अर्ज केला असेल तर त्यास संपूर्ण परीक्षा शुल्काचा परतावा दिला जाईल.

४. याशिवाय अन्य कारणास्तव उमेदवाराचे परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

**१६) मुक्त विद्यालय मंडळाच्या विभागीय कार्यालयाची कामे –**

उमेदवाराशी संबंधित विभागीय मंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील –

१. नावनोंदणी कालावधी, परीक्षेचे आवेदनपत्र भरण्याच्या कालावधीबाबत आवश्यक ती प्रसिध्दी देणे.

२. संपर्क केंद्रामार्फत प्राप्त झालेल्या नोंदणी अर्जांची छाननी करणे.

३. पात्र उमेदवारांची नावनोंदणी प्रमाणपत्रे (**Enrollment Certificate**) ऑनलाईन पध्दतीने काढून घेऊन उमेदवारांना वितरीत करण्याबाबत सर्व संपर्क केंद्रांना कळविणे.

४. संपर्क शिबीराचे वेळी संपर्क केंद्रांना भेटी देऊन पाहणी करणे.

५. नावनोंदणी शुल्कातून रु १००/- प्रशासकीय खर्च वजा करून उर्वरित रक्कम अपात्र उमेदवारास परत करणे.

६. राज्यस्तरावरून दिलेल्या नियोजनप्रमाणे संपर्क केंद्र समन्वयकाच्या मदतीने परीक्षांचे आयोजन करणे.

७. संपर्क केंद्रामार्फत उमेदवारांना प्रवेशपत्रे वितरित करणे.

८. स्वयंअध्ययन साहित्य संपर्क केंद्रांच्या मदतीने उमेदवारांपर्यंत पोहोचविणे.

९. उमेदवाराच्या ज्या समस्यांचे निराकरण संपर्क केंद्रावर होणार नाही त्या समस्यांचे निराकरण करणे.

१०. उमेदवारास प्रत्यक्ष भेटीत अथवा दूरध्वनीवरून आवश्यकतेनुसार योग्य ते मार्गदर्शन करणे.

याशिवाय मुक्त विद्यालय मंडळाच्या मुख्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार/सूचनांनुसार कार्यवाही करणे.

**१७)परिशिष्ट –**



Scanned with CamScanner

# प्रपत्र–'अ'

**प्राथमिक स्तर इ.५ वी/उच्च प्राथमिक स्तर इ. ८ वी परीक्षेसाठी नावनोंदणी करतेवेळी कोणत्याही शाळेच्या पटावर नाव नसल्याबाबत उमेदवाराने सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

मी ---------------- ---------------- ----------------

( आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे/पतीचे नांव )

वय वर्षे ------

निवासाचा पूर्ण पत्ता :- -----------------
--------------------------------
--------------------------------

सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो/करते की, मी महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी/ इयत्ता ८ वी साठी प्रवेश घेऊ इच्छितो/इच्छिते. माझे नांव सद्यस्थिती:ा कोणत्याही औपचारिक शाळेच्या पटावर नाही.

वरील माहिती ही संपूर्णपणे खरी आहे. ती खोटी आढळून आल्यास होणाèया परिणामास व शिक्षेस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- ---------
दिनांक:- ---------

उमेदवाराची स्वाक्षरी
संपूर्ण पत्ता -------------------
--------------------------
--------------------------

## सत्यापन

मी ---------------- ---------------- ---------------

( आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे नांव )

प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती/विधान माझ्या माहिती आणि समजूतीप्रमाणे सत्य असून कोणतीही माहिती/बाब लपविण्यात आलेली नाही.

ठिकाण:- ---------
दिनांक:- ---------

उमेदवाराची स्वाक्षरी
संपूर्ण पत्ता -------------------
--------------------------
--------------------------



Scanned with CamScanner

# प्रपत्र – 'ब'

## औपचारिक शाळेत गेला नसल्याबाबत उमेदवाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र

(वय वर्षे १८ पेक्षा जास्त असलेल्या उमेदवाराने को-या कागदावर सादर करावयाचा स्वसाक्षांकित प्रतिज्ञा पत्राचा नमुना)

मी,------------------ ------------------ ------------------

( आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे/पतीचे नांव )

वय वर्षे ------

निवासाचा पूर्ण पत्ता :- ------------------
---------------------------------
---------------------------------

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या प्राथमिक स्तरावरील इयत्ता ५ वी/उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ८ वी परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छित असून सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो/करते की, यापूर्वी मी कोणत्याही शाळेत प्रवेश घेवून औपचारिक शिक्षण घेतलेले नाही.

वरील माहिती ही संपूर्णपणे खरी आहे. ती खोटी आढळून आल्यास होणाऱ्या परिणामास व शिक्षेस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- ---------
दिनांक:- ---------

उमेदवाराची स्वाक्षरी
संपूर्ण पत्ता ----------------------
------------------------------
------------------------------

## सत्यापन

मी ------------------ ------------------ ------------------

( आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे नांव )

प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती/विधान माझ्या माहिती आणि समजूतीप्रमाणे सत्य असून कोणतीही माहिती/बाब लपविण्यात आलेली नाही.

ठिकाण:- ---------
दिनांक:- ---------

उमेदवाराची स्वाक्षरी
संपूर्ण पत्ता ----------------------
------------------------------
------------------------------



Scanned with CamScanner

# प्रपत्र–'क'

## उमेदवार औपचारिक शाळेत गेला नसल्याबाबत पालकाने दयावयाचे प्रतिज्ञापत्र

(१८ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या उमेदवाराचे बाबतीत त्याचे वतीने त्याच्या पालकाने कोऱ्या कागदावर सादर करावयाचा स्वसाक्षांकित प्रतिज्ञा पत्राचा नमुना)

मी ---------------- ---------------- ----------------

( आडनांव          स्वतःचे नांव          वडिलांचे/पतीचे नांव )

सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो/करते की, माझा पाल्य ---------------------------
-------------------------------------------------------
निवासाचा पूर्ण पत्ता :- -----------------
------------------------------
------------------------------

माझा पाल्य हा/ही महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या प्राथमिक स्तरावरील इयत्ता ५वी/ उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ८ वी परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छित असून त्याने यापूर्वी कोणत्याही शाळेत प्रवेश घेवून औपचारिक शिक्षण घेतलेले नाही.

वरील माहिती ही संपूर्णपणे खरी आहे. ती खोटी आढळून आल्यास होणाऱ्या परिणामास व शिक्षेस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- ---------

दिनांक:- ---------

पालकाची स्वाक्षरी

संपूर्ण पत्ता --------------------
--------------------------
--------------------------

## सत्यापन

मी ---------------- ---------------- ----------------

( आडनांव          स्वतःचे नांव          वडिलांचे नांव )

प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती/विधान माझ्या माहिती आणि समजूतीप्रमाणे सत्य असून कोणतीही माहिती/बाब लपविण्यात आलेली नाही.

ठिकाण:- ---------

दिनांक:- ---------

पालकाची स्वाक्षरी

संपूर्ण पत्ता --------------------
--------------------------
--------------------------



Scanned with CamScanner

## प्रपत्र – 'ड'

(वयाचा दाखला उपलब्ध नसल्यास उमेदवाराच्या वयाबाबत पालकाने द्यावयाच्या प्रतिज्ञा पत्राचा नमुना)

मी ------------------ ------------------ ------------------

( आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे/पतीचे नांव )

सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो/करते की, माझा पाल्य ------------------------------
------------------------------------------------------------

निवासाचा पूर्ण पत्ता :- ------------------
----------------------------------
----------------------------------

माझा पाल्य हा/ही महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या प्राथमिक स्तरावरील इयत्ता ५ वी/उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ८ वी च्या मुक्त विद्यालयाच्या परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छित असून त्याचा/तिचा जन्म दाखला उपलब्ध नाही. तसेच जन्म तारीख कोठेही दसरी नोंदविण्यात आलेली नाही. मात्र माझ्या समजूतीप्रमाणे त्याचा/तिचा जन्म -----------मध्ये झाला. आधार कार्डावरील नोंदीनुसार त्याची/तिची जन्म तारीख/जन्म वर्ष -------- प्रमाणे असून आज रोजी त्याचे/तिचे वय --- वर्षे आहे.

वरील माहिती ही संपूर्णपणे खरी आहे. ती खोटी आढळून आल्यास होणाटेया परिणामास व शिक्षेस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाणः- ---------

दिनांकः- ---------

पालकाची स्वाक्षरी

संपूर्ण पत्ता ---------------------
----------------------------
----------------------------

## सत्यापन

मी ------------------ ------------------ ------------------

( आडनांव स्वतःचे नांव वडिलांचे नांव )

प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती/विधान माझ्या माहिती आणि समजूतीप्रमाणे सत्य असून कोणतीही माहिती/बाब लपविण्यात आलेली नाही.

ठिकाणः- ---------

दिनांकः- ---------

पालकाची स्वाक्षरी

संपूर्ण पत्ता ---------------------
----------------------------
----------------------------



Scanned with CamScanner

# प्रपत्र–'इ'

## नमुना FORMAT

संपर्क केंद्र माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव -----------------------------------

Name of the Contact Centre Secondary School/Junior College ------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क केंद्रशाळेचा मंडळ सांकेतिक क्रमांक -----------------

School/Jr.College Index No. -----------------------------

युडाइस क्रमांक ---------------------- जन.रजि.नोंदणी क्र.-----------

UDISE No. ---------------------------------- General Register Entry No. -----------------

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या उमेदवारास द्यावयाचे प्रमाणपत्र

(जनरल रजिस्टर ठेवणे)

Certificate to be given by Maharashtra State Board of Open School

(Mainatain a General Register)

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पूर्ण नांव Name in full of the Candidate<br>* युनिक क्रमांक Unic No. | |
| २ | आईचे नांव Mother's Name | |
| ३ | जात व पोटजात Caste and Sub-caste | |
| ४ | राष्ट्रीयत्व Nationality | |
| ५ | धर्म Religion | |
| ६ | जन्मस्थळ (तालुका व जिल्हयासह) Place of Birth (with Taluka & District) | |
| ७ | जन्मतारीख, महिना व वर्ष (ख्रिस्ती शकाप्रमाणे अंकी व अक्षरी)<br>Date of Birth, Month & Year (in figures and words as per Christian calender) | |
| ८ | मातृभाषा Mother Tongue | |
| ९ | परीक्षेचे माध्यम Medium of Exam | |
| १० | मुक्त विद्यालय मंडळात नोंदणी केल्याची तारीख<br>Date of Registration in the Open School | |
| ११ | इयत्ता ५ वी समकक्ष/इयत्ता ८ वी समकक्ष अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याची तारीख. (निकालाची तारीख) | |
| १२ | परीक्षा केंद्र Exam Centre | |
| १३ | बैठक क्रमांक Seat Number | |
| १४ | परीक्षेचे वर्ष Year of Examination | |
| १५ | प्रमाणपत्र दिल्याची तारीख Issueing Date of Certificate | |

प्रमाणित करण्यात येते की, संबंधित उमेदवाराने महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी(समकक्ष)/इयत्ता ८ वी(समकक्ष) या वर्गाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला आहे. विद्यार्थ्यांने सादर केलेल्या अभिलेखांवरून/प्रतिज्ञापत्रांवरून प्रमाणपत्रात नमूद केलेली माहिती नोंदविण्यात आली आहे.

**संपर्क केंद्र संबंधित लिपिक – स्वाक्षरी**

**सहायक केंद्रसमन्वयक – स्वाक्षरी**

**केंद्र समन्वयकाची स्वाक्षरी**

**केंद्र शाळेचा शिक्का**



Scanned with CamScanner

# प्रपत्र – 'फ'

## विभागीय मंडळ कार्यालयांची संपर्कासाठी माहिती

| अ. क्र. | विभागीय मंडळ | पत्ता | समाविष्ट जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | पुणे | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-४११००५.<br>दूरध्वनी : (०२०) २५५३६७८१,८२,८३ फॅक्स : (०२०) २५५३६७६१ | पुणे, अहमदनगर, सोलापूर |
| २ | नागपूर | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स,नागपूर-४४०००१<br>दूरध्वनी : (०७१२) २५६०२०९ फॅक्स :(०७१२) २५६१७७५ | नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया |
| ३ | औरंगाबाद | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद विभागीय मंडळ, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद -४३१००५.<br>दूरध्वनी : (०२४०) २३३४२२८ फॅक्सः (०२४०) २३२१२०१ | औरंगाबाद, बीड, परभणी, हिंगोली, जालना |
| ४ | मुंबई | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, प्लॉट नं. २७ व २८, सेक्टर-१६ए, वाशी, नवीमुंबई -४००७०३.<br>दूरध्वनी : (०२२) २७८८१०७५,७७ फॅक्स : (०२२) २७६५१४९१ | मुंबई, बृहन्मुंबई, ठाणे, रायगड, पालघर |
| ५ | कोल्हापूर | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, ५३९, कसबा करवीर, शिवाजी विद्यापीठाम गे, राजेंद्रनगर जवळ, कोल्हापूर -४१६००४.<br>दूरध्वनी : (०२३१) २६९६१०१,०३ फॅक्स : (०२३१) २६९०७५८ | कोल्हापूर, सातारा, सांगली |
| ६ | अमरावती | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, शास्त्रीनगर,अमरावती-४४४६०२.<br>दूरध्वनी : (०७२१) २६६२६५७ फॅक्स : (०७२१) २६६२७४९ | अमरावती,अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ |
| ७ | नाशिक | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, वाणी हाउस, ऋणानुबंध मंगल कार्यालयमासमोर,न्यु मुंबई-आग्रा महामार्ग, नाशिक-४२२००१<br>दूरध्वनी : (०२५३) २५९२१४१,४३ फॅक्स : (०२५३) २५९९३५९ | नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार |
| ८ | लातूर | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभागीय मंडळ, सूत मिल एरिया, राजस्थान मारवाडी हायस्कूलच्या मागे, कणेरी रोड, लातूर-४१३५३१.<br>दूरध्वनी : (०२३८२) २५८१४१ फॅक्स : (०२३८२) २५८२१९ | लातूर, नांदेड, उस्मानाबाद |
| ९ | कोकण | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोकण विभागीय मंडळ, एम.आय.डी.सी.,इ-७७/०६, मिरजोळे, रत्नागिरी - ४१५६१२.<br>दूरध्वनी : (०२३५३) २३१२५१ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग |



Scanned with CamScanner

# संपर्क केंद्र

उद्देश :- महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळात प्रवेश घेतलेल्या उमेदवारास प्रवेश, विषययोजना, शुल्क, परीक्षेचे स्वरूप, आवेदनपत्र, स्वयंअध्ययन साहित्य, संपर्क शिबिर, नावनोंदणी, स्वयंअध्ययनाबाबत तज्ज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन, परीक्षा कालावधी, मूल्यमापन योजना इ.बाबत मार्गदर्शन होणे.

रचना :- संपर्क केंद्रात संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/शाळेचे प्राचार्य/मुख्याध्यापक हे केंद्र समन्वयक असतील. ते संपर्क केंद्राचे प्रमुख असतील. केंद्र समन्वयकांच्या मदतीस एक सहायक केंद्र समन्वयक असतील. त्यांची नियुक्ती संबंधित केंद्र समन्वयक करतील. संपर्क केंद्रात एक लिपिक व एक शिपाई असेल.

कामे :-

१) संपर्क केंद्रावर उमेदवाराने नावनोंदणी (Online) केल्यानंतर, नावनोंदणी विषयक कागदपत्रे उमेदवाराकडून संपर्क केंद्रावर जमा करून घेणे.
२) उमेदवाराचे शुल्क स्वीकारणे.
३) उमेदवाराचे आवेदनपत्र भरून घेणे व उमेदवारास विषय योजनेबाबत मार्गदर्शन करणे.
४) परीक्षा प्रवेशपत्र (हॉल तिकीट) उमेदवारास देणे.
५) उमेदवारास गुणपत्रक व प्रमाणपत्र देणे.
६) स्वयंअध्ययन पुस्तिका/कृतिपुस्तिका, प्रकल्प, अंतर्गत मूल्यमापन याबाबत महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या नियमाप्रमाणे पूर्तता करणे.
७) संपर्क केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना शिक्षक मार्गदर्शनाची व्यवस्था उपलब्ध करून देणे.
८) संपर्क केंद्रावरील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाकडून प्राप्त झालेले स्वयंअध्ययन साहित्य व इतर साहित्य उमेदवारांना देणे.
९) महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षेपूर्वी तीन महिने अगोदर संपर्क केंद्रावर उपस्थित असणाऱ्या उमेदवारांना वेळापत्रकानुसार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.
१०) संपर्क केंद्रावर महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या निर्देशानुसार संपर्क शिबिराचे आयोजन करणे व त्याचे अभिलेख ठेवणे.

**संपर्क शिबिर –**

१) संपर्क शिबिरास उमेदवाराची उपस्थिती अनिवार्य असेल.
२) संपर्क शिबिराचे आयोजन संपर्क केंद्रावर करण्यात येईल.
३) संपर्क शिबिराचा कालावधी प्रात्यक्षिक विरहीत विषयांसाठी दहा (१०) दिवसांचा व प्रात्यक्षिक असलेल्या विषयांसाठी पंधरा (१५) दिवसांचा असेल. शिबिराचा कार्यकाल सकाळी ११=०० ते संध्याकाळी ५=०० असा राहील.
४) या शिबिरामध्ये उमेदवारांना आलेल्या अडचणींचे निराकरण करून घेता येईल.
५) संपर्क शिबिरात उमेदवारांना आवश्यक असलेले मार्गदर्शन व अभ्यासासाठी उपयुक्त माहिती मिळेल.
६) वेळापत्रकानुसार दररोज उमेदवारांना मार्गदर्शन करण्यात येईल.
७) शिबिराचे वेळापत्रक मुक्त विद्यालय मंडळाच्या निर्देशानुसार केंद्र समन्वयक तयार करतील.



Scanned with CamScanner